स्वराज्य श्रीराज्याभिषेक शके ३५०

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

वसई विरार शहर महानगरपालिका
स्थापना ३ जुलै २००९

# मुख्य कार्यालय, विरार

विरार (पूर्व),
ता.वसई, जि.पालघर - ४०१ ३०५.

दूरध्वनी : ०२५ - २५२५१०१/०२/०३/०४/०५/०६
फॅक्स : ०२५ - २५२५१०७
ई-मेल :


जावक क्र.: व.वि.श.म./वाचनालय/०७ /२०२४-२५
दिनांक : ०५ /०७ /२०२४

## जाहीर दरपत्रक सूचना

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सार्वजनिक वाचनालय, विरार व डॉ.के.ब.हेडगेवार सार्वजनिक वाचनालय, नवघर या दोन सार्वजनिक वाचनालयांसाठी सन २०२४-२५ या वित्तीय वर्षाकरिता लागणारी दैनंदिन वर्तमानपत्रे, साप्ताहिके, मासिके, पाक्षिके, नियतकालिके, वार्षिके व दिवाळी अंक इत्यादी वाचनसाहित्य दरपत्रक मागवून खरेदी करावयाचे आहे. त्याकरिता सार्वजनिक वाचनालय विभागामार्फत जाहिर दरपत्रक मागविण्यात येत आहे. सदर दरपत्रकामध्ये दरपत्रकधारकाने मराठी, इंग्रजी, गुजराती, हिंदी व उर्दु अश्या विविध भाषेतील वर्तमानपत्रे, साप्ताहिके, पाक्षिके, मासिके, नियतकालिके, वार्षिके व दिवाळी अंक इ.वाचनसाहित्याचे दर स्वतंत्रपणे सादर करावयाचे आहेत. दरपत्रकधारकाने वरील कामाचा दरपत्रकाचा सिलबंद लिफाफा मंगळवार, दि. १६/०७/२०२४ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत महानगरपालिकेच्या सार्वजनिक वाचनालय, विरार (पूर्व) येथे दुस-या मजल्यावरील कार्यालयात दिलेल्या मुदतीत जमा करावयाचा आहे.

| अ.क्र | कामाचा तपशिल | तपशिल | सर्व प्रकारच्या वाचनसाहित्याचे एकत्रित दर (सूट) टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | सार्वजनिक वाचनालयसाठी सन २०२४-२५ या वित्तीय वर्षाकरिता लागणारी वर्तमानपत्र, साप्ताहिके, पाक्षिके, मासिके, नियतकालिके व दिवाळी अंक इ.वाचनसाहित्य पुरवठा करणे. | वर्तमानपत्र<br>साप्ताहिके<br>पाक्षिके<br>मासिके<br>नियतकालिके<br>वार्षिक,<br>दिवाळी अंक | सूट (अंकात) -<br><br>सूट (अक्षरात) - |

अटी शर्ती :-

१) दरपत्रकधारकाने दराच्या लिफाफ्यासोबत व्यक्तीचे/संस्थेचे पॅनकार्ड, आधारकार्ड इ.ची छायांकित प्रत स्वयंसाक्षांकित करून व आयुक्त वसई विरार शहर महानगरपालिका या नावाने रू.६००० /- इसारा रक्कमेचा डी.डी इ.कागदपत्रे सादर करावयाची आहेत.

२) मुदतीत प्राप्त झालेली कोणतीही अथवा सर्व दरपत्रके स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार मा. आयुक्त वसई विरार शहर महानगरपालिका यांनी राखून ठेवलेला आहे.

३) दरपत्रकधारकाने नमूद वाचनसाहित्याचा पुरवठा सार्वजनिक वाचनालयाने नेमून दिलेल्या ठिकाणी मुदतीत व वेळेत करावयाचा आहे.

४) मनुष्यबळ, वाहन व यंत्रसामुग्री महानगरपालिका पुरविणार नाही.

५) नैसर्गिक आपत्तीमुळे होणा-या जिवित व वित्त हानीस महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.

६) शासनाचे कर शासनास / महानगरपालिकेच्या फंडात जमा करण्याची जबाबदारी दरपत्रकधारकाची आहे.

७) वरील अटीचे पालन जे दरपत्रकधारक करणार नाहीत त्यांचे दरपत्रक पडताळणी अंती अपात्र ठरविण्यात येतील.

८) दरपत्रक मंजूर झाल्यानंतर दरपत्रकधारकाने ०५ दिवसांचे आत कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहून सदरच्या कामाचा करारनामा रूपये ५००/- स्टॅम्पपेपरवर करावयाचा असून मुदतीत करारनामा न केल्यास दरपत्रक रद्द करण्यात येईल. करारनामा करण्यापूर्वी रू.१८००० /- सुरक्षा अनामत रक्कम डी.डी द्वारे भरणा करणे बंधनकारक आहे तदनंतर कार्यादेश देण्यात येईल.

९) करारनामा झाल्यानंतर कोणत्याही कारणास्तव कामातून माघार घेता येणार नाही.असे झाल्यास संबंधित दरपत्रकधारकाने भरलेली इसारा रक्कम व सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

१०) सदरचे दरपत्रक महानगरपालिकेच्या सुचना फलकावर व अधिकृत संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले आहे.

उप -आयुक्त (वाचनालय)
वसई विरार शहर महानगरपालिका